पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ११३

सभावृत्तांत

दिनांक - ०६/०५/२०१४ वेळ - सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक ०६/०५/२०१४ रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा. महेशदादा किसन लांडगे - सभापती
२. मा. धराडे शकुंतला भाऊसाहेब
३. मा. कदम सदगुरु महादेव
४. मा. शेंडगे आशा सुखदेव
५. मा. ओव्हाळ रमा नितीन ऊर्फ सनी
६. मा. भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
७. मा. सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
८. मा. विनय ऊर्फ विनायक रमेश गायकवाड
९. मा. अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
१०. मा. प्रसाद शेट्टी

या शिवाय मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.झुरे - सह आयुक्त, मा.टेकाळे, मा.गावडे, मा.कुलकर्णी, मा.ढेरे, मा.गायकवाड, मा.फुंदे, मा.दुरगुडे, मा.माछरे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.घाडगे - मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे – विकास अभियंता, मा.तुपे - सह शहर अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.भदाणे -उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.निकम, मा.काची, मा.चव्हाण, मा.शरद जाधव, मा.थोरात, मा.साळवी, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.बरशेट्टी, मा.गलबले, मा.घोडे, मा.केदारी, मा.कन्हेरे, मा.कांबळे, मा.भोसले – कार्य.अभियंता, मा.उबाळे - प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.कांबळे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्य.), मा.पाटील – प्राचार्य आयटीआय मोरवाडी, मा.बोदडे – प्रशा.अधि.जनसंपर्क व माहिती विभाग हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा.सदगुरु कदम अनुमोदक : मा.विनय गायकवाड

शुक्रवार दिनांक ०९/०५/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

मा.सभापती - शुक्रवार दिनांक ०९/०५/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( महेशदादा किसन लांडगे )
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ११३

सभावृत्तांत

( दिनांक ०६/०५/२०१४ ची तहकूब सभा )

दिनांक - ०९/०५/२०१४ वेळ - सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक ०६/०५/२०१४ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक ०९/०५/२०१४ रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा. महेशदादा किसन लांडगे - सभापती
२. मा. कदम सदगुरु महादेव
३. मा. शेंडगे आशा सुखदेव
४. मा. ओव्हाळ रमा नितीन ऊर्फ सनी
५. मा. भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
६. मा. सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
७. मा. तरस बाळासाहेब जयवंत
८. मा. विनय ऊर्फ विनायक रमेश गायकवाड
९. मा. प्रसाद शेट्टी

या शिवाय मा.राजीव जाधव – आयुक्त, मा.झुरे - सह आयुक्त, मा.टेकाळे, मा.कुलकर्णी, मा.ढेरे, मा.गायकवाड, मा.फुंदे, मा.खांडकेकर, मा.दुरगुडे, मा.माछरे, – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.तुपे - सह शहर अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.भदाणे -उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.सवणे, मा.इंगळे, मा.काची, मा.चव्हाण, मा.शरद जाधव, मा.थोरात, मा.साळवी, मा.खाबडे, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.केदारी, मा.संजय कांबळे – कार्य.अभियंता, मा.साळुंके - मुख्य उद्यान अधिक्षक, मा.बहुरे – प्रशासन अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक – ६७८४ विषय क्रमांक – ०१
दिनांक – ०९/०५/२०१४ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.बाळासाहेब तरस अनुमोदक – मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/१अ/कावि/२४५/२०१३ दि. २३/०४/२०१३.
विषय - प्रभाग क्र.१७ मधील लोकमान्य हॉस्पीटल चौक ते रेल्वे लाईन पर्यंतच्या रस्त्यास कॉंक्रीटचा रस्ता दुभाजक करणे.

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७८५ विषय क्रमांक – ०२

दिनांक – ०९/०५/२०१४ विभाग – जलनि:सारण

सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जनि/कावि/२/१०५/२०१४ दि. २२/०४/२०१४.

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

शहर स्वच्छता (City Sanitation) कार्यक्रमांतर्गत मनपा परिसरात गर्दीच्या ठिकाणी जसे वर्दळीचे चौक, बसथांबे, भाजीमंडई इ.ठिकाणी तरंगत्या लोकसंख्येसाठी स्त्री-पुरूषांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधणेचे नियोजन आहे सदर कार्यक्रमांतर्गत जागेच्या उपलब्धतेनुसार तसेच आवश्यकतेनुसार स्वच्छतागृहांचे वेगवेगळे ४ प्रकार करण्यात आलेले आहेत. बांधणेत येणारी स्वच्छतागृहे ही शक्यतो स्वयंसेवी संस्था, मनपा परिसरातील बांधकाम व्यवसायिक, उद्योजक यांचे खर्चाने बांधण्याचा मानस आहे. त्यासाठी प्रथमतः ६४ ठिकाणी स्वच्छतागृहे बांधणेसाठी वर्तमानपत्रात जाहीर प्रकटन देण्यात आलेले होते. त्यापैकी १७ ठिकाणी बांधकाम व्यवसायिक व १२ ठिकाणी स्वयंसेवी संस्थांनी स्वच्छतागृहे बांधण्यास सहमती दर्शविलेली आहे. उर्वरीत ठिकाणे व सन्मा. सदस्य यांनी सुचविलेली काही नवीन ठिकाणे यासह पुनश्चः वर्तमानपत्रात जाहीर प्रकटन देण्यात येत आहे. स्वयंसेवी संस्था तसेच विकसक/उद्योजक इ.यांना स्वच्छतागृहे बांधणेसाठी अनुमती देण्यापुर्वी मनपाचे धोरण निश्चित करणे आवश्यक असुन त्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्याबाबत तपशील खालीलप्रमाणे –

**अ) विकसक यांनी बांधकाम करावयाचे स्वच्छतागृहांबाबत -**

१) विकसकांनी बांधकामाचा संपुर्ण खर्च करावयाचा असुन मनपा स्पेसिफिकेशननुसार, ड्रॉईंगनुसार बांधकाम विहित मुदतीत करावयाचे आहे. २) बांधकामाचे नकाशात, स्पेसिफिकेशनमध्ये काही बदल करावयाचे असतील तर त्यास मनपाची पुर्वमान्यता घ्यावी. ३) विकसकाने बांधलेल्या स्वच्छतागृहाचे ठिकाणी विकसकांस त्यांची जाहीरात करण्यास परवानगी राहील (कालावधी १५ वर्षे) ४) विकसकाने १५ वर्षे कालावधीसाठीचा देखभाल दुरूस्तीचा खर्च मनपास जमा करणेत यावा. ५) स्वच्छतागृहासाठी पाणीपुरवठा मनपा निवासी दराने करेल, तसेच मनपामार्फत नळजोडणी मोफत करून देण्यात येईल, वीज कनेक्शन विकसकांने स्वतः घ्यावयाचे असुन त्याचे देयकाची अदायगी संबंधित देखभाल करणारी संस्था करेल. ६) बांधकामासाठी विकसकांने पाणीपुरवठा, वीज इ. व्यवस्था स्वतः स्वखर्चाने करणेत यावी. ७) सदर स्वच्छतागृहाबाबत प्रथमत: मनपा व विकसक यांच्यात करारनामा करणेत येईल व बांधकाम पूर्ण झाल्यानंतर स्वच्छतागृहाचे देखभाल दुरुस्तीसाठी स्वयंसेवी संस्थेची नेमणूक मनपामार्फत करुन स्वच्छतागृह स्वयंसेवी संस्थेच्या ताब्यात देण्यात येईल. ज्या स्वयंसेवी संस्थांनी मनपा परिसरात इतरत्र शौचालये BOT तत्वावर चालविणेस घेतली आहेत त्यांना प्राधान्य देण्यात येईल. ८) देखभाल दुरुस्तीच्या कालावधीत काही दुर्घटना, अपघात झालेस त्याची संपूर्ण जबाबदारी स्वच्छतागृह चालविणाऱ्या संस्थेची राहील.

**ब) स्वयंसेवी संस्थांनी बांधावयाच्या स्वच्छतागृहांबाबत -**

१) स्वयंसेवी संस्थेने त्यांचे खर्चाने स्वच्छतागृह बांधुन त्याची देखभाल “पैसे द्या व वापरा” या तत्वावर ३० वर्षासाठी करावयाची आहे. २) मनपाने ठरवुन दिलेल्या नकाशाप्रमाणे, स्पेसिफिकेशनप्रमाणे तसेच विहित मुदतीत बांधकाम करणे बंधनकारक राहील. ३) बांधकामासाठी संस्थेने पाणीपुरवठा, वीज इ. व्यवस्था स्वतः करावयाची आहे. ४) स्वच्छतागृहासाठी पाणीपुरवठा मनपा निवासी दराने करेल. तसेच मनपामार्फत नळजोडणी मोफत करून देण्यात येईल. ५) वीजपुरवठा कनेक्शन संबंधित संस्थेने घ्यावयाचे असुन त्याचे देयकदेखील नियमित अदा करावयाचे आहे. ६) सदर ठिकाणी जाहिरात करणेचे

हक्क संबंधित संस्थेस ३० वर्षापर्यंत राहतील. ३० वर्षानंतर स्वच्छतागृह मनपास हस्तांतरीत करावयाचे आहे. ७) स्वच्छतागृह वापरांसाठी प्रति व्यक्तीस रू.५/- अंघोळीसाठी रू.१०/- शुल्क आकारावयाचे असुन मुतारीचा वापर मोफत राहील. अंघोळीसाठी गरम पाणी तसेच स्वच्छतागृह वापरणेसाठी लिक्विड सोपची सोय करणे संस्थेवर बंधनकारक आहे. ८) ठरविलेल्या दरात वाढ करावयाची झाल्यास त्यास मनपाने गठीत केलेल्या समितीचे समन्वयाने करणे भाग राहील. ९) देखभाल दुरुस्तीच्या कालावधीत काही दुर्घटना, अपघात झालेस त्याची संपूर्ण जबाबदारी स्वच्छतागृह चालविणा-या संस्थेची राहील.

**क) ज्या ठिकाणी "पैसे द्या व वापरा" या तत्वावर स्वच्छतागृह बांधणे शक्य होणार नाही अशा ठिकाणांबाबत -**

१) अशा ठिकाणी स्वच्छतागृह बांधणेचा खर्च पुर्णपणे मनपास करावा लागेल, निविदा काढुन बांधकाम करणेत येईल. २) बांधलेली स्वच्छतागृहे स्वयंसेवी संस्थेस ३० वर्षे कालावधीसाठी "पैसे द्या व वापरा" तत्वावर चालविणेस देण्यात येतील. ज्या स्वयंसेवी संस्थांनी मनपा परिसरात इतरत्र शौचालये BOT तत्वावर चालविणेस घेतली आहेत त्यांना प्राधान्य देण्यात येईल. ३) स्वच्छतागृह चालविणेबाबत शहर स्वच्छता कमिटी मार्फत धोरण, अटी शर्ती निश्चित करण्यात येवून जाहिर प्रकटनाव्दारे निविदा मागवून नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. ४) देखभाल दुरुस्तीच्या कालावधीत काही दुर्घटना, अपघात झालेस त्याची संपूर्ण जबाबदारी स्वच्छतागृह चालविणा-या संस्थेची राहील. वरीलप्रमाणे 'अ', 'ब' व 'क' स मान्यता देणेत येत आहे. तसेच खराळवाडी येथील महात्मा फुले पुतळयाजवळ विविध सांस्कृतिक कार्यक्रम होत असल्याने यापूर्वी जेथे संडासब्लॉक होते तेथेच महिला व पुरुषांसाठी स्वच्छतागृहे व मुता-या बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७८६ विषय क्रमांक – ०३

दिनांक – ०९/०५/२०१४ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.आशा शेंडगे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/७/कावि/३२५/२०१४ दि. २८/०४/२०१४.

विषय - मनपाचे आरोग्य विभागासाठी तातडीने आवश्यक जंतुनाशक/किटकनाशक औषध खरेदी करणेबाबत...

विषय क्रमांक ०३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७८७ विषय क्रमांक – ०४

दिनांक – ०९/०५/२०१४ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/लेखा/९/कावि/१४३/२०१४ दि. ०२/०५/२०१४.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

दै.टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्राला जाहीरात क्र.४८५ त्याच्या आवृत्ती मध्ये प्रसिध्द केले असलेने प्रसिध्दीचे बिल १) दै.टाईम्स ऑफ इंडिया याना अदा करावयाचे र.रू.३,०६,२८८/- (अक्षरी र.रू.तीन लाख सहा हजार दोनशे अठ्ठ्याऐंशी) च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**ठराव क्रमांक – ६७८८** **विषय क्रमांक – ०५**
**दिनांक – ०९/०५/२०१४** **विभाग – पाणीपुरवठा**
**सुचक – मा.शांताराम भालेकर** **अनुमोदक – मा.प्रसाद शेट्टी**
**संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/०६/कावि/६७२/२०१४ दि. ३०/०४/२०१४.**

**मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -**

**पाणी पुरवठा विभागाकडील कूपनलिका (बोअरवेल) बाबत जाहीर निवेदन जाहिरात दै.सकाळ, दै.लोकसत्ता व दै.लोकमत प्रसिद्ध करणेत आलेले होती. सदर जाहिरीतीस जास्तीत जास्त प्रसिद्धी मिळणेच्या दृष्टीने याकामी विशेष रोटेशन घेणेत आलेले होते. दै.लोकमत व दै.लोकसत्ता या दोनही वृत्तपत्रांना यापूर्वीच त्यांची बिले अदा करणेत आलेली असून दै.सकाळ यांचे बिल दि.३१/१२/२०१३ रोजी या कार्यालयास प्राप्त झालेले असून त्यांनी सदर जाहिरात दि.०३/११/२०१२ चे अंकात बिनचूक प्रसिद्ध करून जाहिरात साईज ३०x१६ = ४८० चौ. से. मी. X दर र. रु.२२५/- प्र.चौ. से.मी. नुसार होणारे बिल र.रु.१,०८,०००/- (अक्षरी र.रू.एक लाख आठ हजार) त्यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.**

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

----------

**ठराव क्रमांक – ६७८९** **विषय क्रमांक – ०६**
**दिनांक – ०९/०५/२०१४** **विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार**
**सुचक – मा.सुनिता गवळी** **अनुमोदक – मा.सदगुरु कदम**
**संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/०५/कावि/२७६/२०१४ दि. ०२/०४/२०१४.**
**विषय - एक्स-रे फिल्म व एक्स-रे केमीकल खरेदी बाबत...**

**विषय क्रमांक ०६ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.**

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

----------

**ठराव क्रमांक – ६७९०** **विषय क्रमांक – ०७**
**दिनांक – ०९/०५/२०१४** **विभाग – प्रशासन**
**सुचक – मा.प्रसाद शेट्टी** **अनुमोदक – मा.सदगुरु कदम**
**संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१८/कावि/५०२/२०१४ दि. २९/०४/२०१४.**

**मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -**

**मा.मुख्य सचिव नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे RGPA समितीच्या बैठकीस दि.११/०२/२०१४ रोजी राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान अहवाल सादरीकरण करणेसाठी कलर प्रिंटीग काढणेत आल्या. तसेच राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अहवाल समिती सदस्य यांना वितरित करणेत आला. सदरचे काम SIDDHI COPIER & Student Consumer Store Pimpri यांचे कडून करुन घेतले आहे. त्याकामी त्यांचेकडील Invoice No. ११२ र.रु. ५४००/- Invoice No. १११ र.रु. ९९६०/- अशी एकुण र.रु.१५,३६०/- अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.**

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

----------

ठराव क्रमांक – ६७९१ विषय क्रमांक – ०८
दिनांक – ०९/०५/२०१४ विभाग – प्रशासन
सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.विनय गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/८/कावि/५०३/२०१४ दि. २९/०४/२०१४.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

**National Workshop on RTI** या विषयाबाबत **Indian Institute of Public Administration New Delhi** येथे आयोजित कार्यशाळेस दि.०९/०१/२०१४ रोजी मा.आयुक्त साहेब यांचे समवेत डॉ.उदय टेकाळे,

सहाय्यक आयुक्त प्रशासन उपस्थित राहिले होते. सदर ठिकाणी जाण्या-येण्यासाठी विमान प्रवासाची तिकिटे **Prasanna Purple Mobility Solutions P. Ltd.** यांचेमार्फत आरक्षित करण्यात आली असून, सदर आरक्षित तिकिटांचा खर्च र.रु.२२,६६७/- इतका झालेला असून सदरचा खर्च **Prasanna Purple Mobility Solutions P. Ltd.** यांना अदा करणेत आलेला आहे. **National Workshop on RTI** या विषयाबाबत आयोजित कार्यशाळेस दिल्ली येथे जाणेसाठी विमान प्रवासकामी झालेल्या र.रु.२२,६६७/- (अक्षरी र.रू.बावीस हजार सहाशे सदुसष्ट) खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७९२ विषय क्रमांक – ०९
दिनांक – ०९/०५/२०१४ विभाग – करसंकलन
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.कर/मुख्य/०१/कावि/५११/२०१४ दि. ३०/०४/२०१४.
विषय - मिळकत सर्व्हेक्षण डेटा एंन्ट्रीसाठी ठेकेदारी पध्दतीने संगणक चालक घेणेबाबत...

विषय क्रमांक ०९ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( महेशदादा किसन लांडगे )
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/४/कावि/४१३/२०१४
दिनांक - १३/०५/२०१४



नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना